सायं.दैनिक आवाज जनसामान्यांचा..

# बीड किसान

• संपादक : शेख कामरान •

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ४४ ▪ शुक्रवार, दि. २० जून, २०२५ ▪ पोस्टल दिनांक २१ जून, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-44 ▪ Friday 20 June, 2025 ▪ Postal Date 21 June, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक संदर्भात लवकरच आघाडीचा निर्णय – शरद पवार

बारामती (किसान न्युज): महाविकास आघाडीतील शिवसेना (ठाकरे), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढवण्याबाबत चर्चा करतील आणि लवकरच निर्णय जाहीर होईल.' असे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी स्पष्ट केले. मागील तीन वर्षांपासून रखडत पडलेल्या जिल्हापरिषद,पंचायत समिती, नगरपरिषद, महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेण्याचे कोर्टाने आदेश दिले. यानंतर राज्यात निवडणुकीची जोरदार तयारी सुरू आहे. या निवडणुका महायुती आणि महा विकास आघाडी निवडणूक एकत्र लढणार की, वेगवेगळे याबाबत अद्याप काहीही स्पष्ट नाही. परंतु याबाबत आघाडी लवकरच निर्णय घेणार असल्याचे जेष्ठ नेते शरद पवार यांनी सांगितले आहे. ते बारामती येथे प्रसार माध्यमांशी बोलताना पवार म्हणाले,' सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तीन महिन्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्याव्या लागतील. यासंदर्भात महाविकास आघाडीतील पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढवण्याबाबत चर्चा करतील. लवकरच निर्णय जाहीर होईल.उद्धव ठाकरेंची मुंबईत मोठी ताकत आहे. त्यांना विश्वासात घेऊन निवडणुकीला सामोरे जावे लागेल.' असेही शरद पवार म्हणाले.

# जिल्हा परिषदेचे अतिरिक्त सीईओ वासुदेव सोळूंकेंच्या शासकिय निवास दुरुस्तीसाठी जि.प.फंडातून २१ लाखाचे वर्क आॅर्डर; मजूर सोसायट्यांच्या आडून सोळूंकेंनी पैसा स्वत:च्या खिश्यात वळवला!

### ११ दिवस पहिलेच त्याच निवासस्थानी दुरुस्तीसाठी एका सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याच्या नावाने पंधराव्या केंद्रीय वित्त आयोग सन २०२१-२२ च्या फंडातून दुरुस्तीसाठी ५ लाख ८८ हजार व संरक्षण भिंतीसाठी ९ लाख ८१ हजार दिले

### अशी रक्कम अन् तारखेला निघाले आदेश आदेशाचा दि.०७ जून २०२२

या दुरुस्तीसाठी नेमलेली उमराई मजूर सहकारी संस्था मर्यादित बीड यांनी सन २०२२-२३ मध्ये जिल्हा परिषदेचे स्वत:चे उत्पन्न मधून जुन्या पंचायत समिती आवारातील कर्मचारी निवासस्थान गाळा क्रमांक एक व दोन ची दुरुस्ती करण्यासाठी नऊ लाख ८१ हजार ३३८ रुपये चे काम केले.

याच उमराई मजूर सहकारी संस्था यांनी जुन्या पंचायत समिती आवारातील कर्मचारी निवासस्थान क्रमांक एक व दोन येथे फरशी बसविण्याचे काम जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या उत्पन्नातून त्याच तारखेला म्हणजेच २०२२-२३ मध्ये केले.

याच उमराई संस्थेने त्याच तारखेच्या कार्यक्रमामध्ये जुन्या पंचायत समिती आवारातील निवासस्थान गाळा क्रमांक एक व दोन येथे जल निरीक्षण व मलिनिसारण व्यवस्था व रंगरंगोटी करण्यासाठी दहा लाख रुपये जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या उत्पन्नामधून २०२२ २३ झाली वापरले.

### आदेशाचा दि. २९ सप्टेंबर २०२२

वसंत मजूर सहकारी संस्था मर्यादित आंतरवन पिंपरी यांच्या नावाने पंचायत समिती आवारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निवासस्थान ज्योती संरक्षण सुशोभीकरण यासाठी १५ व्या केंद्रीय वित्त आयोग सन २०२०-२१ च्या पैशातून ४ लाख ९१ हजार रुपये वापरले.

### आदेशाचा दि. २३ मार्च २०२१

भागवत अवताडे कॉन्ट्रॅक्टर याच्या नावाने पुन्हा तेच पंचायत समिती आवारातील अधिकाऱ्यांचे निवासस्थान गाळा क्रमांक एक व दोन दुरुस्ती करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या उत्पन्नातून पुन्हा २ लाख ४९ हजार रुपये वापरले.

### एकच गुत्तेदाराच्या नावे दोन वर्क ऑर्डर

याच तारखेला पवन कुमार सुधीरराव सरवदे यांच्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता च्या नावाखाली दिनांक २६- ५ - २०२२ रोजी पंधरावा केंद्रीय वित्त आयोग सन २०२१-२२ या योजनेअंतर्गत जिल्हा परिषद अधिकारी निवासस्थान बीड परिसरात बंदिस्त नाली बांधकाम केले.

त्या कामासाठी ५ लाख ८८ हजार रुपये वापरण्यात आले. पुन्हा तीच तारीख तोच गुत्तेदार २६ -५ -२०२२ रोजी सुशिक्षित बेरोजगार अभियंता पवन कुमार सुधीरराव सरोदे यांच्या नावावर पंधराव्या केंद्रीय वित्त आयोग सन २०२१- २२ जिल्हा परिषद अधिकारी निवासस्थान संरक्षण भिंत व गेटचे काम करण्यासाठी ९ लाख ८१ हजार रुपये वापरले.

### वासुदेव सोळूंके वादग्रस्तच

मागे जिल्हापरिषद शाळेतील विद्यार्थ्यांची अमेरिका येथे नासा सहल झाली. त्यावेळी ही या सहलीमध्ये विद्यार्थी कमी आणि जिल्हापरिषद चे अधिकारी कुटुंबासह गेले होते. त्यात याच ॲडिशनल सीईओ वसुदेव सोळूंके यांचे नाव सर्वात वर होते. या नासा सहल प्रकरणी ही ते बदनाम असून याचीही चौकशी समिती नेमली आहे. त्याचं काय झालं हे समोर आले नाही. यामुळे ते वादग्रस्त ठरलेले आहेत.



बीड । अदनान खान

जिल्हापरिषदेचे एसीईओ वासुदेव सोळूंके यांच्या निवासस्थाची सन२०२०-२०२१ आणि २०२१-२२ अशी दोनवेळा दुरुस्ती करण्यात आली. यासाठी त्यांनी पदाचा पूर्णपणे फायदा उचलत एकाच दिवसात एकाच दिवशी एकाच तारखेला तीन वर्क ऑर्डर काढून अधिकारी हिताचे काम असेलतर प्रशासन कसे रॉकेटच्या गतीने सुसाट धावते याचे हे जिवंत उदाहरण आहे. तुम्ही जर वरीष्ठ अधिकारी असाल तर इतका फायदा तर घ्यावाच लागतो ना अशी उपरोधिक टोला लावण्यात येत असून, या निवासस्थान दुरुस्तीची चौकशी करुन यातील घोटाळा उघड करावा अशी मागणी करण्यात येत आहे. जिल्हापरिषदेचे एसीईओ वासुदेव सोळूंके यांच्या जुनी पंचायत समिती परिसरातील शासकीय निवासस्थान गाळा १ आणि २ याची २०२०-२१ आणि २०२१-२२ या दोन वर्षांत दोनवेळा दुरुस्ती करण्यात आली. २०२०-२१ मध्ये दुरुस्ती करताच पुन्हा एक वर्षात असं काय झालं की, दुसऱ्याच वर्षी २०२१-२२ मध्ये पुन्हा दुरुस्ती करण्यात आली. यासाठी नियम अटींची पायमल्ली करुन धाब्यावर बसविण्यात आले याचे एक-एक कारणामे आता उघड होत आहे. या घराच्या दुरुस्तीसाठी दोन वर्षांत तब्बल अर्धा कोटी खर्ची घालण्यात आले. यामुळे हा निवासस्थान कसा असेल याचा अंदाज लावण्यात येत आहे. पण प्रत्यक्षात त्याची अवस्था पाहून तर डोळेच पांढरे होतील अशी आहे. या दुरुस्तीसाठी संबंधित बांधकाम विभाग आणि अधिकाऱ्यांनी असे फटाफट निर्णय घेतले की, याचे नवल वाटत आहे. इतर विकास कामांसाठी एक आदेश काढण्यासाठी महिनो लागतात असे चित्र आहे. तर हे पाहिले असता मोठा अधिकारी असेल अन् यात » पान २ वर



## पाचशे कुटुंबाच्या चुली पेटविणारा तरुणांचा खरा नायक

वाढदिवस विशेष

**बीड शहरातील युवा उद्योजक रणजीत क्षीरसागर यांनी अत्यंत कमी दिवसांत मेहनतीच्या बळावर यशाची भरारी घेतली आहे. या यशाने हुरळून न जाता सामाजिक भान राखत गरजुंसाठी मदतीचा हात पुढे ठेवला तर शहरातील व ग्रामीण भागातील जवळपास ५०० तरुणांच्या हाताला काम मिळवून देत त्यांच्या चुली पेटविण्याचे मोठे कार्य केले आहे. यामुळे रणजीत क्षीरसागर यांना तरुणांचा खरा नायक म्हणून संबोधले जाऊ लागले आहे. भारत देश हा सर्वाधिक तरुणांचा देश म्हणून जगात ओळखला जातो पण या तरुणाईला राजकारणासाठी वापरून त्यांच्या आयुष्याची राखरांगोळी करण्यात येत असल्याचे चित्र आहे.**

तरुणांच्या हाताला काम देऊन वृद्ध माता-पित्याची काठी ठरावी यासाठी प्रयत्न करण्याचे सत्तेत असणारेच आपली खुर्ची टिकविण्यासाठी या तरुणांचा गैरवापर करीत असल्याची ओरड होत आहे. आपल्या मागे फिरविण्यासाठी या तरुणांना प्यायला आणि खायला देतात आणि यातून हे तरुण व्यसनाच्या आहारी जाऊन आयुष्य बरबाद करुन घेत आहेत. ते कामाचे नाही राहिले की, त्यांना सोडून देत दुसरे जाळ्यात अडकविण्यासाठी तयार असतात. परंतु अशा काळातही तरुणांच्या हाताला काम मिळावे आणि जन्मदात्यासांठी मुले आधार ठरावेत यासाठी काम करणारे रणजीत क्षीरसागर सारखेही तरुण असतात. रणजीत क्षीरसागर या तरुण उद्योजकाने सीताई कन्स्ट्रक्शन सुरु करुन शहरातील नागरीकांसाठी दर्जेदार रस्ते आणि शासकीय इमारती बांधून कामातून ओळख निर्माण केली. मेहनत, चिकाटी अन् दर्जेदार कामे यातून सीताई कन्स्ट्रक्शन अल्पावधीतच शासन आणि प्रशासन व जनतेच्या विश्वासास पात्र ठरले. हे कामे करीत असताना मोठा शासकीय गुत्तेदार म्हणून रणजीत क्षीरसागर यांनी ओळख निर्माण करुन यशाचे शिखर गाठले. पण याने हुरळून न जाता त्यांनी पाय नेहमी जमिनीवर ठेवली, आजही हा तरुण शहरभर कामाच्या ठिकाणी जाताना स्कूटीवरच फिरतो, साधा रहाणीमान अन् उच्च विचारसरणी याचे पालन करतो. हा तरुण नेहमीच समाजातील अडचणीत असलेल्यांच्या मदतीला धावून जातो. पाहिजे तशी मदत करीत हजारो लोकांचे आशीर्वाद घेतो. तसेच आपल्या जवळ असणारे मोठे व्हावे या विचाराने जवळपास ५०० तरुणांच्या हाताला सीताई कन्स्ट्रक्शनच्या माध्यमातून काम दिले. यामुळे या तरुणांच्या कुटुंबाला मोठा आधार ठरला असून, यांच्या चुली पेटविण्याचे मोठे काम केले. यामुळे या माणसाला शहरात मोठा मान असून, तो पैशांने नसून त्यांच्या सेवाभाव यामुळे आहे. यामुळेच रणजीत क्षीरसागर या तरुणांच्या नायकाचा आज २० जून रोजी वाढदिवस आहे. या **वाढदिवसाच्या निमित्ताने किसान परिवाराकडून खूप खूप शुभेच्छा...!**

## ठेवीदारांचे बलिदान व्यर्थ जाऊ देणार नाही : उबाळे

बीड । किसान न्युज

ज्ञानराधा व छत्रपती मल्टिस्टेटमध्ये अडकलेल्या ठेवीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक विवंचनेतून खळेगाव येथील ठेवीदार शेतकरी सुरेश जाधव यांनी काल आत्महत्या केली. या घटनेची माहिती कळाल्यानंतर स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र ठेवीदार संघर्ष कृती समितीचे मुख्य प्रवर्तक प्रा.सचिनभैय्या उबाळे यांनी जाधव कुटुंबियांची गुरुवारी (दि.१९) भेट घेऊन सांत्वन केले. ठेवीदारांचे बलिदान वाया जाऊ देणार नाही असे प्रा.उबाळे म्हणाले. जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट, पतसंस्थांमुळे » पान २ वर



## ३३ के.व्ही. नवीन लाईनच्या कामाचा आ.क्षीरसागरांकडून शुभारंभ

### बीड शहर आणि ग्रामीण भागातील वीजेचा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लागणार

बीड । किसान न्युज

बीड शहर आणि ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याचा भार अत्याधिक असल्याने सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्यातून ३३ के.व्ही. च्या १२ किलोमीटर अंतराच्या नवीन लाईनचे काम मंजूर झाले असून या कामाचे आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.२०) रोजी उद्घाटन करण्यात आले आहे. या कामाला लगेच प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे. बीड शहर आणि ग्रामीण भागात वीजपुरवठा करण्यासाठी सद्यस्थितीला १३२ के.व्ही. ची लाईन कार्यरत » पान २ वर



## गेवराई न्यायालय इमारतीच्या विस्तारीत बांधकामासाठी १० कोटी : विजयराजे

### आ.पंडितांकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार व्यक्त

गेवराई । किसान न्युज

गेवराई दिवाणी न्यायालय इमारतीच्या विस्तारीत बांधकामासाठी १० कोटी २ लक्ष रुपयांचा निधी मंजुर झाला असून या कामास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. गेवराई येथील न्यायालयाच्या अस्तित्वातील इमारतीवर अतिरिक्त एक मजला आणि चार नवीन कोर्ट हॉलच्या बांधकामाचा यामध्ये समावेश आहे. आ. विजयसिंह पंडित यांनी निवडणुक जाहिरनाम्यामध्ये या





कामाचे आश्वासन दिले होते. गेवराई न्यायलयीन इारतीच्या विस्तारीत बांधकामासाठी १० कोटी २ लक्ष रुपयांचा निधी मंजुर केल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांचे जाहिर आभार व्यक्त केले आहेत. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आपल्या जाहिरनाम्यात आ. विजयसिंह पंडित यांनी गेवराई येथील न्यायालय इमारतीच्या विस्तारीत बांधकामासह गेवराई येथे अतिरिक्त » पान २ वर

## दारुड्याचा पोलिसांवर हल्ला; गुन्हा दाखल

बीड । किसान न्युज

भाजी मंडई परिसरात एका दारुड्याने मजूराला अडवून मारहाण करीत जबरदस्तीने खिशातील २०० रुपये काढून घेतले. याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात दारुड्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. तर यावेळी पोलीस मध्यस्थी करीत असताना दारुड्याने पोलिसांवर ही हल्ला केला. गुरुवारी दि.१९ दुपारी ४ वाजता दारुच्या नशेत असलेल्या शेख कलीम रा. इस्लामपुरा बीड याने मजुराला अडवून दारु पिण्यासाठी पैसे मागितले त्याने पैसे न दिल्याने चापटा, बुक्क्यांनी मारहाण करून जबरदस्तीने खिशातील २०० रुपये काढून घेतले आहे. यावेळी भांडणे सोडविण्यासाठी आलेल्या पोलिसांवरही या दारुड्याने हल्ला केल्याचा गंभीर प्रकार घडला आहे. याप्रकरणी गणेश जगन्नाथ खडे रा. नांदुरा मोतीपुरा ता. नांदूरा जि. बुलढाणा ह.मु. सोनार गल्ली नवी भाजी मंडई ,बीड याने फिर्याद दिली. या फिर्यादीवरून बीड शहर पोलीस ठाण्यात आरोपी शेख कलीम शेख जमाल रा. इस्लामपुरा, बीड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा अधिक तपास सपोनि बी.बी. राठोड हे करीत आहेत.




